**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७**

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ९

सभावृत्तांत

दिनांक १६/०३/२०१८ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे मार्च २०१८ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक १६/०३/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ३) | मा. श्री. कलाटे राहुल तानाजी | सदस्य |
| ४) | मा. श्री. कलाटे मयुर पांडुरंग | सदस्य |
| ५) | मा. श्री. कामठे तुषार गजानन | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ७) | मा. श्री. कस्पटे संदीप अरुण | सदस्य |
| ८) | मा. श्रीमती कुटे निर्मला संजय | सदस्या |
| ९) | मा. श्रीमती शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्या |
| १०) | मा. श्री. विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे | सदस्य |
| ११) | मा. श्रीमती मुंढे उषा अंकुश | सदस्या |

-----------------

या शिवाय, मा.श्रीमती स्मिता झगडे, क्षेत्रीय अधिकारी, मा.सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव सभा शाखा, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. लेखाधिकारी अशोक बोनगीर, मा. संदेश खडतरे, उपअभियंता, बीआरटीएस, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. इंगळे आर.एम. उपअभियंता, झोनिपू स्थापत्य, मा. पाटील एस. वाय., मा.संध्या वाघ, उपअभियंता, स्थापत्य, मा.राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. नरोटे सुनिलदत्त, उपअभियंता, स्था. उद्यान, मा. सहा. आरोग्याधिकारी विनोद बेंडाळे, मा. अजय जाधव, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. एच.आर. सरवदे, कार्यालय अधिक्षक, अतिक्रमण, मा. कुतवळ एस.यु, मा. अमिन दिक्षीत, मा.प्रवीण धुमाळ, मा. शरद मोरमारे, कनिष्ठ

अभियंता, पाणीपुरवठा, मा. मुलाणी बी.एम., ढोले बी.आर., कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. भालेराव यु.ए., कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. तावरे महेश, मा. संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. मोरे बी.जे. कनिष्ठ अभियंता, स्थापत्य उद्यान, मा. गेंगजे विश्वास, क्रीडा निरीक्षक, मा. सी.सी. मोरे, हॉर्टीकल्चर सुपरवायझर, मा. जे.व्ही.पटेल, उद्यान निरीक्षक, मा. आर.एम. सौदाई, मा. ए.सी. सोनवणे, मा. जी.एन. खैरे, उद्यान सहाय्यक, मा. एम.पी. सुभेदार, मा. काळे एल.टी., अतिक्रमण निरीक्षक इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे मार्च २०१८ च्या नियमित ड प्रभाग समिती सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा.सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

**सन्मा. सदस्यांच्या मागणीप्रमाणे व मा. सभापती यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१**: औंध रावेत बी.बी.आर.टी. मार्गावरील १६ नंबर येथे नव्याने सब-वे झाला आहे. या सब-वेला दिनांक १०/११/२०१७ रोजीच्या प्रभाग समिती सभेमध्ये कावेरीनगर सब-वे असे नाव देण्याचा ठराव संमत करण्यात आला होता. सदर प्रस्ताव रद्द करुन त्यास " कै.ह.भ.प. नारायण लक्ष्मण पवार" असे नामकरण करण्याचा प्रस्ताव

**विषय क्र.** २ : रक्षक चौक येथील कृत्रिम धबधबा रस्ता रुंदीकरण झाल्याने अर्धवट तुटलेला आहे तसेच तो धबधबा गेल्या अनेक वर्षापासुन बंद आहे. त्यामुळे येथे पाण्याचा पण अपव्यव होतो. सदर बाब लक्षात घेऊन सदर धबधबा पाडणेबाबतचा प्रस्ताव

**विषय क्र.** ३ : सावित्रीबाई फुले उद्यान विशालनगर येथे नव्याने विरंगुळा केंद्र तयार झालेले आहे. सदरच्या विरंगुळा केंद्रास "स्वामी विवेकानंद विरंगुळा केंद्र" असे नामकरण करण्याचा प्रस्ताव

**विषय क्र.** ४ : प्रभाग क्र. २६ विशालनगर येथील वाकड फाटा वाय जंक्शन सब-वेला "वाकड फाटा- चोंधे पाटील जंक्शन" असे नामकरण करणे

**विषय क्र.** ५ : प्रभाग क्र. २६ मधील धर्मवीर संभाजी महाराज चौक (काळेवाडी फाटा) ते छत्रपती चौक कस्पटेवस्ती पासुन मानकर चौक व छत्रपती चौक ते उत्कर्ष चौक रस्त्यावर हातगाडीवाले, पथारीवाले यांच्यामुळे सतत सार्वजनिक वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला महिला, वयोवृध्द, मुले, नागरीकांना पदपथावरुन पायी चालण्यास देखील जागा शिल्लक राहत नाही. रस्त्याच्या पदपथावर हॉकर्स ने मांडलेल्या साहित्यामुळे

नागरीकांना मोठया अडथळयाला सामोरे जावे लागत आहे. याबाबत नागरीक सतत लोक प्रतिनिधीकडे तक्रार करत आहेत. वाहतुक कोंडीसह पदपथ रिकामे होण्यास वरील मार्गावर नो हॉकर्स झोन आणि नो टॉलरन्स झोन करणेबाबतचा प्रस्ताव

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे मार्च २०१८ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव : माहे मार्च २०१८ च्या नियमित सभेचे कार्यपत्रिका क्र. ९ वरील विषयास मंजुरी मिळावी.**

**मा. सभापती** :- माहे मार्च २०१८ चे नियमित सभेचे कार्यपत्रिका क्र. ९ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत येत आहे.

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव** : मागील सभा माहे फेब्रुवारी २०१८ ची कार्यपत्रिका क्र.७ व माहे फेब्रुवारी २०१८ ची विशेष समिती सभा कार्यपत्रिका क्र. ८ च्या प्रभाग समिती सभांचे सभावृत्तांत कायम करणेस मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : मागील सभा माहे फेब्रुवारी २०१८ ची कार्यपत्रिका क्र.७ व माहे फेब्रुवारी २०१८ ची विशेष समिती सभा कार्यपत्रिका क्र. ८ च्या प्रभाग समिती सभांचे सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर कार्यपत्रिकेवरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र. २०

दिनांक : १६/०३/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्री.विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे अनुमोदक:मा.सौ. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा.श्री.विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे यांचा दिनांक ०५/०१/२०१८ रोजीचा प्रस्ताव

पिंपळे सौदागर येथील रोझलँड रेसिडेन्सी शेजारील स.नं. १३०, १३२,१३३,१३४ पैकी महापालिकेचे उद्यान आरक्षण क्र. ३७१ ब प्रमाणे उद्यान विकसित करण्यात येत आहे. या उद्यानाला शोभेल असे “राजमाता जिजाऊ उद्यान” नामकरण करणेच्या माहे फेब्रुवारी २०१८ च्या ड प्रभाग समितीमध्ये तहकुब करण्यात आलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. व सन्मा. सदस्यांच्या मान्यतेने पिंपळे सौदागर येथील रोझलँड रेसिडेन्सी शेजारील स.नं. १३०, १३२,१३३,१३४ पैकी महापालिकेचे उद्यान आरक्षण क्र. ३७१ ब प्रमाणे विकसित करण्यात येत असलेल्या उद्यानाचे काम पूर्ण झालेवर उद्यानाला शोभेल असे “राजमाता जिजाऊ उद्यान” नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------

विषय क्र. २ ठराव क्र. २१

दिनांक : १६/०३/२०१८ विभाग : नगररचना विभाग

सूचक: मा.श्री. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक :मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे

संदर्भ:मा. श्री. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.०२/०२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मौजे वाकड येथील सर्व्हे नं. ८३ मधील मंजूर विकास योजनेतील भुमकर चौक ते हिंजवडी या ३०.० मीटर रुंद रस्त्यापासून दक्षिण बाजूकडील असणा-या नाल्याशेजारील हरित पट्टयातुन १२.० मीटर रुंद रस्ता सर्व्हे नं. ८३,८८ व १३९ मधुन १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंत करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबतचा माहे फेब्रुवारी २०१८ च्या बैठकीतील तहकुब विषयाबाबत चर्चा झाली. सन्मा. सदस्य श्री. संदीप कस्पटे यांनी दिनांक १६/३/२०१८ अन्वये सदर प्रस्ताव रद्द करणेबाबत पत्र सादर केले.

सदर पत्रानुसार मौजे वाकड येथील सर्व्हे नं. ८३ मधील मंजूर विकास योजनेतील भुमकर चौक ते हिंजवडी या ३०.० मीटर रुंद रस्त्यापासून दक्षिण बाजूकडील असणा-या नाल्याशेजारील हरित पट्टयातुन १२.० मीटर रुंद रस्ता, सर्व्हे नं. ८३,८८ व १३९ मधुन १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंत करण्यामुळे काही शेतकरी भूमीहिन होत असल्याने असे करणे योग्य होणार नसल्याने तेथील तांत्रिक त्रुटी निदर्शनास आल्या आहेत. सबब सदर रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबतचा प्रस्ताव रद्द करणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------

विषय क्र. ३ ठराव क्र. २२

दिनांक : १६/०३/२०१८ विभाग : नगररचना विभाग

सूचक: मा.श्री. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक :मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे

संदर्भ : मा. श्री. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.०२/०२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मौजे वाकड येथील सर्व्हे नं. ७३ मधील मंजूर विकास योजनेतील भुमकर चौक ते हिंजवडी या ३०.० मीटर रुंद रस्त्यापासून उत्तर बाजूकडील असणा-या नाल्याशेजारील हरित पट्टयातुन १२.० मीटर रुंद रस्ता सर्व्हे नं. ७३व ७२ मधुन १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंत करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २०५ अन्वये घोषित करणेचा माहे फेब्रुवारी २०१८ च्या बैठकीतील तहकुब विषयाबाबत चर्चा झाली. सन्मा. सदस्य श्री. संदीप कस्पटे यांनी दिनांक १६/३/२०१८ अन्वये सदर प्रस्ताव रद्द करणेबाबत पत्र सादर केले.

सदर पत्रानुसार मौजे वाकड येथील सर्व्हे नं. ७३ मधील मंजूर विकास योजनेतील भुमकर चौक ते हिंजवडी या ३०.० मीटर रुंद रस्त्यापासून उत्तर बाजूकडील असणा-या नाल्याशेजारील हरित पट्टयातुन १२.० मीटर रुंद रस्ता सर्व्हे नं. ७३व ७२ मधुन १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंत करण्यामुळे काही शेतकरी भूमीहिन होत असल्याने असे करणे योग्य होणार नसल्याने तेथील तांत्रिक त्रुटी निदर्शनास आल्या आहेत. सबब सदर रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबतचा प्रस्ताव रद्द करणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------

विषय क्र. ४ ठराव क्र. २३

दिनांक : १६/०३/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्री. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक :मा. श्री. तुषार गजानन कामठे

संदर्भ : मा.श्री. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.१२/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मौजे वाकड सर्व्हे नं. १७८/१, प्रभाग क्र. २६ भिंगारे कॉर्नर शेजारील गल्लीस “सम्राट कॉलनी” हे नाव स्थानिक रहिवाशी यांच्या मागणीनुसार घोषित करणेबाबतचा प्रस्तावावर मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------------

**मा. सचिव, सभाशाखा** : सन्मा. सदस्यांचे मागणीनुसार व मा. सभापती यांचे मान्यतेने दिनांक १६/०३/२०१८ रोजीचे प्रभाग समिती सभेचे वेळी ऐनवेळेस दाखल करुन घेतलेल्या विषयांवर खालीलप्रमाणे मान्यता देणेत आली.

विषय क्र. ५ ठराव क्र. २४

दिनांक : १६/०३/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्री.तुषार गजानन कामठे अनुमोदक : मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे

संदर्भ : मा.श्री. तुषार गजानन कामठे यांचेकडील दि.१६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव

औंध रावेत बी.बी.आर.टी. मार्गावरील १६ नंबर येथे नव्याने सब-वे झाला आहे. या सब-वेला दिनांक १०/११/२०१७ रोजीच्या प्रभाग समिती सभेमध्ये कावेरीनगर सब-वे असे नाव देण्याचा ठराव संमत करण्यात आला होता. सदर प्रस्ताव रद्द करुन औंध रावेत बीआरटी मार्गावरील १६ नंबर येथे नव्याने झालेल्या सबवेला “कै.ह.भ.प. नारायण लक्ष्मण पवार” असे नामकरण करणेबाबत मा. सदस्य श्री. तुषार कामठे यांनी प्रस्ताव मांडला आहे. तथापि सदर सब वे हा ड व ग क्षेत्रीय कार्यालयाचे हद्दीत असल्याने सदर नामकरणाबाबत यापूर्वीच ग क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभाग समितीने ठराव क्र. १२

दिनांक ६/११/२०१७ अन्वये मान्यता दिलेली असल्याने नियमानुसार पुन्हा नव्याने ठराव करावयाची आवश्यकता नाही. सबब सदर प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------

विषय क्र. ६ ठराव क्र. २५

दिनांक : १६/०३/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्री.तुषार गजानन कामठे अनुमोदक : मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे

संदर्भ : मा.श्री. तुषार गजानन कामठे यांचेकडील दि.१६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव

रक्षक चौक येथील कृत्रिम धबधबा रस्ता रुंदीकरण झाल्याने अर्धवट तुटलेला आहे तसेच तो धबधबा गेल्या अनेक वर्षापासुन बंद आहे. त्यामुळे येथे पाण्याचा पण अपव्यव होतो. सदर बाब लक्षात घेऊन सदर धबधबा पाडणेबाबतचे प्रस्तावावर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------

विषय क्र. ७ ठराव क्र.२६

दिनांक : १६/०३/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्री.तुषार गजानन कामठे अनुमोदक : मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे

संदर्भ : मा.श्री. तुषार गजानन कामठे यांचेकडील दि.१६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव

सावित्रीबाई फुले उद्यान विशालनगर येथे नव्याने विरंगुळा केंद्र तयार झालेले आहे. सदरच्या विरंगुळा केंद्रास "स्वामी विवेकानंद विरंगुळा केंद्र" असे नामकरण करण्याचा प्रस्तावावर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------------

विषय क्र. ८ ठराव क्र. २७

दिनांक : १६/०३/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्रीमती आरती सुरेश चोंधे अनुमोदक : मा.श्री. तुषार गजानन कामठे

संदर्भ : मा.श्रीमती आरती सुरेश चोंधे यांचेकडील दि.१६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ विशालनगर येथील वाकड फाटा वाय जंक्शन सब-वेला "वाकड फाटा- चोंधे पाटील जंक्शन" असे नामकरण करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

विषय क्र. ९ ठराव क्र. २८

दिनांक : १६/०३/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्री. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक :मा. श्री. मयूर कलाटे

संदर्भ : मा.श्री. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.१६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ मधील धर्मवीर संभाजी महाराज चौक (काळेवाडी फाटा) ते छत्रपती चौक कस्पटेवस्ती पासुन मानकर चौक रस्त्यावर हातगाडीवाले, पथारीवाले यांच्यामुळे सतत सार्वजनिक वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला महिला, वयोवृध्द, मुले, नागरीकांना पदपथावरुन पायी चालण्यास देखील जागा शिल्लक राहत नाही. रस्त्याच्या पदपथावर हॉकर्स ने मांडलेल्या साहित्यामुळे नागरीकांना मोठया अडथळयाला सामोरे जावे लागत आहे. याबाबत नागरीक सतत लोक प्रतिनिधीकडे तक्रार करत आहेत. वाहतुक कोंडीसह पदपथ रिकामे होण्यास वरील मार्गावर नो हॉकर्स झोन आणि नो टॉलरन्स झोन करणेबाबतचा प्रस्ताव मान्य करुन मा. शहर फेरीवाला समिती कडे पुढील आवश्यक त्या मंजूरीसाठी पाठविणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------

मा. सभापती - सर्व उपस्थितांचे आभार मानुन माहे मार्च २०१८ ची ड प्रभाग समिती सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-
(कदम शशिकांत गणपत)
**सभापती,**
ड प्रभाग समिती,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी – १७

सही/-
(सीताराम बहुरे)
**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/९१ /२०१८
दिनांक – १७ /०४/२०१८